# बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

(बृहन्मुंबई महानगरपालिका)

बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१. **संकेतस्थळ :** www.bestundertaking.com

## जाहीर सूचना

**वितरण व्यवसायाच्या सेवा जोडणीच्या सुधारीत आकाराच्या मान्यतेकरीता बेस्ट उपक्रमाने दाखल केलेल्या याचिकेवर हरकती / अभिप्राय मागविण्याबाबत (२०१७ चे प्रकरण क्र. ८६)**

**१.** बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन (बेस्ट) उपक्रमाने विद्युत अधिनियम २००३ अंतर्गत, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (एमईआरसी किंवा आयोग) आयोगाच्या (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम २००५ अनुसार वितरण व्यवसायाच्या सेवा जोडणीच्या सुधारीत आकाराच्या मान्यते करीता याचिका सादर केली आहे.

**२.** मा. आयोगाने दि. २८ ऑगस्ट, २०१७ रोजी सदर याचिका स्वीकृत केली आहे आणि जनतेकडून हरकती / अभिप्राय मागविण्याकरीता बेस्ट उपक्रमाला विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६४ (२) अंतर्गत जाहीर सूचना प्रसिध्द करण्याकरीता निर्देश दिले आहेत.

**३.** २०१२ च्या प्रकरण क्र. ९० वरील आदेशात मा. आयोगाने पुढील बाब निर्देशित केली होती.

"… BEST should extend their distribution network by providing adequate numbers of Auxiliary distribution pillars/ Mini pillars to the load clusters such that the average length of service can be maintained minimum. The Commission has considered average service length of 20 meters while approving the normative charges for service connection. The cost of infrastructure expansion could be claimed through ARR."

त्यानुसार बेस्टने प्रस्तावित सुधारीत सेवा जोडणी आकारात संधारणेची सरासरी लांबी २० मी. एवढी गृहित धरली आहे तसेच संधारणेच्या ठिकाणापासून २० मी. अंतर पर्यंतचा वितरण जालव्यूह विस्तार / वाढीचा खर्च वार्षिक महसूली आवश्यकतेत अंतर्भूत करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे बेस्ट उपक्रम ५ किलोवॅट ते १५० किलोवॅट पर्यंतच्या लघु दाबाच्या सेवा जोडण्यांचा आकार कमी करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

**४.** सध्या बेस्ट उपक्रमाच्या वितरण क्षेत्रात ग्राहकास १०० किलोवॅट ते १५० किलोवॅट दरम्यान वीज पुरवठयाची आवश्यकता असल्यास, ₹ ६०,०००/- एवढा वीज जोडणी आकार भरावयास लागतो, जो आरईन्फ्रा (रिलायंस इन्फ्रा) आकारत असलेल्या ₹ १२,०००/- च्या तुलनेत जास्त आहे.

**५.** महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा व कामगार विभागानेसुध्दा दि. ११/०५/२०१७ च्या पत्राद्वारे बेस्ट उपक्रमास नविन वीज जोडणी आकार (१५० किलोवॅट भार पर्यंत) कमी करण्याचे निर्देश दिले आहेत.

**६.** यास्तव मुंबईतील इतर वितरण परवानाधारकाच्या सेवा जोडणी आकाराशी सुसूत्रता साध्य करण्याकरीता बेस्ट उपक्रम ५ किलोवॅट ते १५० किलोवॅट पर्यंतच्या सेवा जोडणी आकारात सुधार करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

**७.** **आकारांची अनुसूची :-** बेस्ट उपक्रम पुढील प्रमाणे आकारांची अनुसूची प्रस्तावित करीत आहे.

| अ. क्र. | तपशिल | बेस्टचे प्रचलित आकार (२०१२ च्या प्रकरण क्र. ९० प्रमाणे)(₹) | बेस्टचे सदर प्रकरणात प्रस्तावित केलेले आकार (₹) | टीपीसी-डी चे २०१७ च्या प्रकरण क्र. ८२ मधील प्रस्तावित आकार (₹) |
|---|---|---|---|---|
| | **नवीन जोडणी व विस्तारीत भाराकरीता सेवा जोडणी आकार** | | | |
| १ | **लघु दाब पुरवठा (लो - टेन्शन)** | | | |
| | **एकेरी प्रावस्था (फेज)** | | | |
| १.१ | ५ किलोवॅट वीज भारापर्यंत | २,००० | **२,०००** | २,००० |
| १.२ | ५ किलोवॅट ते १० किलोवॅट वीजभारापर्यंत | ३,००० | **२,०००** | २,००० |
| | **तिहेरी प्रावस्था (फेज)** | | | |
| १.३ | २७ हॉर्स पॉवर पर्यंत मोटीव पॉवर किंवा २० किलोवॅट पर्यंत भार | ९,००० | **३,०००** | ३,००० |
| १.४ | २७ हॉर्स पॉवर ते ६७ हॉर्स पॉवर पर्यंत मोटीव पॉवर किंवा २० किलोवॅट ते ५० किलोवॅट पर्यंत भार | १९,५०० | **६,५००** | ६,५०० |
| १.५ | ६७ हॉर्स पॉवर ते १३४ हॉर्स पॉवर पर्यंत मोटीव पॉवर किंवा ५० किलोवॅट ते १०० किलोवॅट पर्यंत भार | ४०,००० | **१२,०००** | १२,००० |
| १.६ | १३४ हॉर्स पॉवर ते २०१ हॉर्स पॉवर पर्यंत मोटीव पॉवर किंवा १०० किलोवॅट ते १५० किलोवॅट पर्यंत भार | ६०,००० | **१२,०००** | १२,००० |

**८.** बेस्ट उपक्रमाच्या कार्यालयामध्ये लेखी स्वरूपात विनंती केल्यानंतर पुढील दस्तऐवजाच्या/सीडीच्या प्रती प्राप्त करता येतील.

**अ.** याचिका संदर्भातील तपशिलवार दस्तऐवज, सीडी सोबत (इंग्रजीमध्ये) (**"बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम"** यांच्या नावे काढण्यात आलेला ₹ ७५/- एवढ्या रक्कमेचा दर्शनी धनाकर्ष /धनादेश /रोख भरणा केल्यानंतर.)

**ब.** याचिका संदर्भातील तपशिलवार दस्तऐवज (इंग्रजी मध्ये) (₹ ५०/- एवढया रक्कमेचा भरणा केल्यानंतर.)

**क.** याचिका संदर्भातील तपशिलवार दस्तऐवजाची सीडी (इंग्रजी मध्ये) (₹ २५/- एवढया रक्कमेचा भरणा केल्यानंतर).

**बेस्ट उपक्रमाची कार्यालयेः-**

| कार्यालय | पत्ता | दूरध्वनी/फॅक्स क्र. |
|---|---|---|
| नोंदणीकृत कार्यालय | बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई- ४०० ००१. | २२८५६२६२/ फॅक्स क्र. २२८५१२४४ |
| मुख्य कार्यालय | मुख्य अभियंता नियामक, बहुमजली विस्तारीत इमारत, पहिला मजला, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई- ४०० ००१. | २२८५६२६२ विस्तारीत ५६७ २२७९९५६७ |
| विभागीय कार्यालय-१ | ग्राहक सेवा (अ प्रभाग), पहिला मजला, इलेक्ट्रिक हाऊस, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई- ४०० ००१. | २२८५६२६२ विस्तारीत ५१३, ५२३ |
| विभागीय कार्यालय-२ | ग्राहक सेवा (जी दक्षिण प्रभाग), ४था मजला, ॲन्सिलरी इमारत, टिळक रोड (विस्तारीत), वडाळा, मुंबई - ४०० ०३१. | २४१६०३३७/२४१४६२६२ विस्तारीत ५१७, ५५१ |

**९.** प्रस्तृत सुचना देऊन वरील याचिकेवर जनतेकडून हरकती आणि अभिप्राय मागविण्याचे निर्देश मा. आयोगाने बेस्ट उपक्रमास दिले आहे. आपल्या हरकती आणि अभिप्राय, महाव्यवस्थापक, बेस्ट उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, कुलाबा, मुंबई - ४०० ००१, (फॅक्स क्र.२२८५१२४४, ईमेल dcemerc@bestundertaking.com), यांना पाठविल्या असल्याच्या पुराव्यासहित, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०० ००५. (फॅक्स २२१६३९७६, ईमेल mercindia@merc.gov.in) यांना **मंगळवार, दि. २६ सप्टेंबर, २०१७** पर्यंत पाठवाव्यात. ज्या व्यक्तिंना आपल्या हरकती / अभिप्राय सादर करावयाच्या आहेत, त्या हरकती आणि अभिप्राय त्यांनी इंग्रजी अथवा मराठी भाषेमध्ये, सहा प्रतीमध्ये सादर कराव्यात आणि त्यावर आपले पूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि ईमेल पत्ता असल्यास लिहावा. सदर हरकती / अभिप्राय हे एखाद्या वीजग्राहक प्रवर्गाच्या संघटनेच्या वतीने दाखल केलेल्या असल्यास तसा उल्लेख करावा. प्रेषकास आपली बाजू स्वत: उपस्थित राहून मांडावयाची असल्यास तसाही उल्लेख करणे आवश्यक आहे. **बुधवार, दि. ०४ ऑक्टोबर, २०१७ रोजी सकाळी ११.३० वा. सेंट्रम हॉल, पहिला मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०० ००५** येथे होणाऱ्या जाहीर सुनावणीत आयोग आपणास संधी देईल, याबाबत वेगळी सूचना दिली जाणार नाही.

**१०.** **मंगळवार दि. २६ सप्टेंबर, २०१७ पर्यंत मिळालेल्या हरकती आणि अभिप्राय यांना बेस्ट उपक्रम त्या मिळाल्यापासून तीन दिवसाच्या आत परंतु शुक्रवार, दि. २९ सप्टेंबर, २०१७ पूर्वी उत्तर देईल.** बेस्ट उपक्रमाने दिलेल्या उत्तराची प्रत्युत्तरे जाहीर सुनावणी प्रसंगी किंवा उशिरात उशीरा **शुक्रवार, दि. ०६ ऑक्टोबर, २०१७** पर्यंत सादर करू शकतील.

**११.** याचिकेचा संपूर्ण दस्तऐवज बेस्ट उपक्रमाच्या संकेत स्थळावर (**www.bestundertaking.com**) उपलब्ध आहे. तसेच आयोगाच्या संकेतस्थळावर (**www.mercindia.org.in / www.merc.gov.in**) देखील डाऊनलोड करण्यायोग्य स्वरूपात मोफत उपलब्ध आहे.

दि. ०१/०९/२०१७

मुंबई

**महाव्यवस्थापक**

**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**

ज.सं.अ./(सहा.मव्य.(वि.पु.)/नियामक/९७/२०१७

**बेस्टचे वीजबील पाहण्या व भरण्यासाठी बेस्टचे miBEST मोबाईल ॲप वापरा.**